# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (आस्थापना विभाग)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./ ५८ /२०२० दि. ०३/०१/२०२०

प्रति,
मा. प्राचार्य/प्राचार्या
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :- मा. सर्वोच्च न्यायालायने सिव्हील अपिल क्र. ८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दिनांक ०६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत.**

संदर्भ:- १. सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दिनांक २१/१२/२०१९
२. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र दिनांक २३/१२/२०१९.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भाधिन सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई चे शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दिनांक २१/१२/२०१९ चे अवलोकन व्हावे. सदर शासन निर्णयास अनुसरून मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेव्दारे संदर्भीय पत्र क्रमांक २ अन्वये उक्त शासन निर्णयातील जोडलेल्या परिशिष्टानुसार विहीत नमुन्यात कार्यवाहीचा अनुपालन अहवाल विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण नागपुर विभाग, नागपुर यांचेकडे विहीत कालमर्यादेत सादर करण्याबाबत महाविद्यालयांना निर्देश दिलेले आहेत. करीता शासन निर्णयातील निर्देशानुसार कार्यवाहीचा अनुपालन अहवाल तात्काळ शिक्षण संचालनालयाकडे सादर करावा.

**संलग्नः**- संदर्भ क्रमांक १ व २.

(डॉ. ईश्वर एस. मोहुर्ले)
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर :-**

१. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण नागपुर विभाग, नागपुर.

E:\Letters\Circular 169

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

Web : www.dhepune.gov.in
E-mail : prash.dhepune@nic.in

फोन नं. २०२/२६१२२११९,२६०५१५१२,२६१०६२७,२६१२४६३९ फॅक्स न. ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/२०१९/शानिसाप्रवि/आरक्षण/मवि-१ / 16456 दि.२३.१२.२०१९

23 DEC 2019

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली आरक्षण विभाग आवक क्र. 4903 दि 30/12/19 जावक क्र.........दि.........

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
सर्व कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे
सर्व कुलसचिव, सर्व अभिमत विद्यापीठे

**विषयः-माननीय सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ व इतर याचिका दि. ६.७.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत.**

**संदर्भः-शासन निर्णय क्र.बीलीली २०१८/प्र.क्र.३०८/१६ब दिनांक २१.१२.२०१९**

उपरोक्त विषयासंदर्भात सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीबीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दि. २१.१२.२००९ चे अवलोकन व्हावे.

उपरोक्त शासन निर्णयातील निर्देशानुसार विहित कालमर्यादेत कार्यवाही त्वरित कार्यवाही करण्यात यावी. तसेच सर्व विभागीय सहसंचालकांनी त्यांच्या अधिनस्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना शासन निर्णयानुसार विहित कालमर्यादेत कार्यवाही करणेबाबत तात्काळ कळविण्यात यावे.

सदर शासन निर्णयातील कार्यवाहीचा अनुपालन अहवाल शासन निर्णयातील जोडलेल्या परिशिष्टानुसार विहित नमुन्यात प्रस्तुत संचालनालयास सादर करण्यात यावा. विभागीय सहसंचालकांनी अधिनस्त अशासकीय महाविद्यालयांना तात्काळ सूचना देऊन एकत्रित अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करावा.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे.

माननीय सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दिनांक ०६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक: बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : २१ डिसेंबर, २०१९.

वाचा:- (१) माननीय सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी दिलेला निर्णय.
(२) माननीय उच्च न्यायालय, मुंबई,खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र.६२४७/२०१५ मध्ये दि.०१.०२.२०१८ रोजी दिलेला निर्णय.
(३) माननीय उच्च न्यायालय, मुंबई,खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र.३१४०/२०१८ मध्ये दि.२८.०९.२०१८ रोजी दिलेला आदेश.

प्रस्तावना-

माननीय सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ (चेअरमन ॲन्ड मॅनेजिंग डायरेक्टर, एफसीआय आणि इतर विरुद्ध जगदिश बालाराम बहिरा व इतर) व इतर याचिका यामध्ये दि.६ जुलै,२०१७ रोजी मागास जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही, असा निर्णय दिला आहे. माननीय उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी, रिट याचिका क्र.३१४०/२००८ मध्ये दि.२८.०९.२०१८ च्या आदेशान्वये माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दि.३१.१२.२०१९ पर्यंत कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. माननीय उच्च न्यायालयाचे सदर आदेश विचारात घेता माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्यासंदर्भात योग्य ते आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

माननीय सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दि.६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी-

१. **अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली पदे रिक्त करणे** - सर्व प्रशासकीय विभागांनी खुद्द व त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय/निमशासकीय कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या खालील अधिकारी व कर्मचा-यांची संवर्गनिहाय संख्या निश्चित करून त्यांच्या सेवा दि. ३१.१२.२०१९ पर्यंत अधिसंख्य पदांवर वर्ग कराव्यात:-

(अ) अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेले अधिकारी / कर्मचारी,

(ब) अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर विशेष मागासप्रवर्गाचे अथवा अन्य कोणत्याही मागासवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले अधिकारी / कर्मचारी,

(क) अनुसूचित जमातीचा दावा सोडून दिलेले अधिकारी / कर्मचारी,

(ड) नियुक्तीनंतर जातप्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी विहित मुदतीत जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर न केलेले अनुसूचित जमातीचे अधिकारी व कर्मचारी.

(इ) ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्याच्या जात पडताळणी समितीच्या निर्णयाच्या विरोधात माननीय न्यायालयात याचिका दाखल केल्या असतील मात्र त्यांच्या प्रकरणी माननीय उच्च न्यायालयाने किंवा माननीय सर्वोच्च न्यायालयाने जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्याच्या समितीच्या निर्णयास कोणतीही स्थगिती दिली नसेल असे अधिकारी व कर्मचारी .

**२. अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी विशेष भरती मोहिम राबविणे-**

सर्व प्रशासकीय विभागांनी खुद्द व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील परिच्छेद क्र.१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे अधिकारी व कर्मचा-यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग झाल्यानंतर रिक्त होणारी अनुसूचित जमातीच्या प्रवर्गाची पदे अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांमधून सेवाप्रवेश नियमानुसार विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून भरण्यासाठी खालीलप्रमाणे कालबद्ध कार्यक्रम आखून पदे भरण्याची कार्यवाही करावी :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदे भरण्याकरिता आवश्यक ते मागणीपत्र दि. २४.१२.२०१९ पर्यंत आयोगाकडे पाठवावे.

(२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील / जिल्हा निवड समिती व इतर नियुक्ती प्राधिकरणाच्या कक्षेतील पदे-

(अ) सरळसेवेची पदे भरण्याकरिता जाहिरात देणे- दि.२४.१२.२०१९ ते २७.१२.२०१९

(ब) अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख-दि.०४.०१.२०२० ते ०६.०१.२०२०

(क) परिक्षेचे आयोजन- दि ०९.०१.२०२० ते १३.०१.२०२०

(ड) परीक्षेतील पात्र उमेदवारांची कागदपत्र तपासणी, चारित्र पडताळणी, वैद्यकीय तपासणी दि. २५.०१.२०२० पर्यंत

(इ) पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे - दि. ०१.०२.२०२०

३. वरील परि. क्र. १ मधील (अ) ते (इ) या प्रकारांमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांपैकी-

(अ) जे अधिकारी व कर्मचारी त्यांच्या मुळ नियुक्तीच्या पदावर कार्यरत असतील अशाच अधिकारी व कर्मचाऱ्यांची अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेली पदे सरळसेवेने भरण्याकरिता परिच्छेद क्रमांक २ प्रमाणे विशेष भरती मोहिम राबविण्यात यावी.

(ब) ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुळ नियुक्तीच्या पदावरून वरिष्ठ पदावर पदोन्नती देण्यात आली असेल अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांचे रिक्त झालेले मुळ नियुक्तीचे पद याआधीच अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरले गेले असेल तर, असे पद पुन्हा भरण्याची आवश्यकता राहणार नाही. मात्र भरले गेले नसल्यास, अशी पदे वरील (अ) मध्ये समाविष्ट करून भरावीत.

(क) ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्याच्या जात पडताळणी समितीच्या निर्णयाच्या विरोधात माननीय न्यायालयात याचिका दाखल केल्या असल्यास माननीय उच्च न्यायालयाने अथवा माननीय सर्वोच्च न्यायालयाने जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्याच्या समितीच्या निर्णयास स्थगिती दिली असेल तर, अशा प्रकरणी माननीय सर्वोच्च न्यायालयाचे दि.६ जुलै, २०१७ चे आदेश संबंधित न्यायालयाच्या निदर्शनास आणून अशी प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागांनी व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

४.१ अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याच्या कारणास्तव सदर शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात येणा-या अधिकारी व कर्मचा-यांच्या संख्येइतकी, असे अधिकारी व कर्मचारी सध्या ज्या पदावर कार्यरत असतील त्या पदाचे अधिसंख्य पद निर्माण करून त्यांना मानवतावादी दृष्टिकोनातून तसेच प्रशासनाची होणारी अडचण दूर करण्यासाठी सर्व संबंधित प्रशासकिय विभागांनी तात्पुरत्या स्वरूपात ११ महिन्यांकरीता किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अधिसंख्य पदावर नेमणूक द्यावी.

४.२ सदर शासन निर्णयापुर्वी सेवामुक्त करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचारी सेवासमाप्तीपुर्वी ते ज्या पदावर कार्यरत होते त्या पदाचे अधिसंख्य पद निर्माण करून त्यांना मानवतावादी दृष्टिकोनातून तसेच प्रशासनाची होणारी अडचण दूर करण्यासाठी सर्व संबंधित प्रशासकिय विभागांनी तात्पुरत्या स्वरूपात ११ महिन्यांकरीता किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अधिसंख्य पदावर नेमणूक द्यावी.

४.३ परिच्छेद ४.१ प्रमाणे तात्पुरत्या नेमणूकीचे आदेश **परिशिष्ट -क** प्रमाणे निर्गमित करावेत.

परिच्छेद ४.२ प्रमाणे तात्पुरत्या नेमणूकीचे आदेश **परिशिष्ट -ड** प्रमाणे निर्गमित करावेत.

अधिसंख्य पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.असंक-१००१/ प्र.क्र.२९/ २००१/वित्तिय सुधारणा,दि.१०.९.२००१ अन्वये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार **परिशिष्ट -इ** प्रमाणे वित्त विभागास सादर करण्यात यावा.

५. परिच्छेद ४ येथील अधिकारी व कर्मचारी यांना अधिसंख्य पदांवर तात्पुरत्या स्वरूपात ११ महिन्यांकरीता अथवा ते सेवेत असते तर ते ज्या दिनांकाला ते नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अधिसंख्य पदावर नेमणूक दिल्यानंतर त्यांना अनुज्ञेय करावयाच्या सेवाविषयक /सेवानिवृत्तीविषक लाभांबाबत सविस्तर अभ्यास करून शासनास शिफारशी करण्यासाठी स्वतंत्र अभ्यास गटाची स्थापना करण्यात करण्यात येईल.

६. माननीय सर्वोच्च न्यायालय व माननीय उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांचे उपरोक्त निर्णय विचारात घेता सामान्य प्रशासन विभागाचे खालील शासन निर्णय व शासन परिपत्रके अधिक्रमित ठरत आहेत :-

| अनु क्रमांक | शासन निर्णय क्रमांक/ परिपत्रके | विषय |
|---|---|---|
| १ | क्र.बीसीसी- १०९४/प्र.क्र.६८ / ९४/१६-ब, दि.१५ जून,१९९५ | विशेष मागास प्रवर्गाकरिता शासकीय, निमशासकीय सेवेत आरक्षण |
| २ | क्र.बीसीसी- २००४/प्र.क्र.४५/ ०४/१६-ब, दि.२४ जून,२००४ | अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर दिनांक १५.६.१९९५ पूर्वीच सरळसेवेने नियुक्ती झालेल्या अथवा पदोन्नत झालेल्या विशेष मागास प्रवर्गातील कर्मचारी / अधिकारी यांची शासकीय / निमशासकीय सेवेतील ज्येष्ठता निश्चित करणेबाबत |
| ३ | क्र.बीसीसी- २००२/प्र.क्र.९३/ ०४/१६-ब, दि.३० जून,२००४ | अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर सरळसेवा / पदोन्नती झालेल्या बिगर आदिवासी अधिकारी / कर्मचाऱ्यांना शासकीय / निमशासकीय सेवेत संरक्षण देणेबाबत |
| ४ | क्र. बीसीसी-२०१२/प्र.क्र. ३३२/ १६-ब, दि.३०जुलै,२०१३ | मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचाऱ्यांबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास पुढील कार्यवाहीबाबत अनुसरावयाची कार्यपध्दती |
| ५ | क्र.बीसीसी-२०१५/ प्र.क्र. २७६A/१६-ब, दि.२१ ऑक्टोबर २०१५ | दि. १५.६.१९९५ नंतर दि. १७.१०.२००१ पर्यंत शासकीय व निमशासकीय सेवेत अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे नियुक्त झालेल्या ज्या कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे किंवा ज्या कर्मचाऱ्यांनी अद्यापपर्यंत जात वैधता प्रमाणपत्र तयार केले नाही अशा कर्मचाऱ्यांच्या सेवेबाबत |

७. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे, शासकीय अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्था संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे यांना तसेच आरक्षण अधिनियम, २००१ मधील तरतूदीनुसार आरक्षण धोरण लागू असलेल्या सर्व आस्थापनांना लागू राहील.

८. माननीय उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांना याबाबतचा अहवाल दि.३१.१२.२०१९ पर्यंत सादर करावयाचा असल्याने सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/ आस्थापनांना योग्य ते आदेश तातडीने निर्गमित करावेत व सदर आदेशाची तातडीने अंमलबजावणी करावी.

९. सदरचा कार्यपालन अहवाल या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **परिशिष्ट -अ व ब** मध्ये शासनास तातडीने सादर करण्यात यावा.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९१२२११६२०११८७०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rasik Ambadas Khadse

Digitally signed by Rasik Ambadas Khadse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fdc00fa9bc45e4f7281973d193127b898 9dfa5df6a7ab94b005e562ebd5c840e, serialNumber=a47200a14b42f151489f73f3e47c9 e8733991628b2302a3831b945146be88a80, cn=Rasik Ambadas Khadse
Date: 2019.12.21 17:11:58 +05'30'

**(र. अं. खडसे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. माननीय राज्यपाल यांचे सचिव,
२. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. माननीय विरोधी पक्षनेता,विधानपरिषद
५. माननीय विरोधी पक्षनेता,विधानसभा
६. सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
७. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
९. प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
१०. प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
११. सर्व विभागीय आयुक्त,
१२. सर्व सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष)
१३. सर्व जिल्हाधिकारी,
१४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१५. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१७. प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

१८. प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
१९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२०. सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२१. सचिव,राज्य माहिती आयोग,
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२३. राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२४. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२५. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२६. संचालक, समाजकल्याण, पुणे,
२७. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२८. संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२९. संचालक, सेवायोजन, मुंबई,
३०. निवड नस्ती १६-ब.

**शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि. २१ डिसेंबर, २०१९ चे**

**परिशिष्ट- अ**

**पदभरतीचा तपशिल**

| अ. क्र. | विभागाचे नाव | मंजूर पदसंख्या | | अ.ज. साठी राखीव पदांची संख्या | अ.ज.च्या भरलेल्या पदांची संख्या | अ.ज.चे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्या अधिकारी व कर्मचा-यांची संख्या | अ.ज.चे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचा-यांची संख्या | अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आल्यामुळे रिक्त झालेली एकूण भरावयाची पदे | महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविलेल्या पदांची संख्या | स्तंभ क्र.९ येथील पदांव्यतीरीक्त जाहीरात दिलेल्या पदांची संख्या | परीक्षेचा दिनांक | नेमणूक दिल्याचा दिनांक | एकूण भरलेली पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | |
| | | गट-अ | | | | | | | | | | | |
| | | गट-ब | | | | | | | | | | | |
| | | गट-क | | | | | | | | | | | |
| | | गट-ड | | | | | | | | | | | |
| | | एकूण | | | | | | | | | | | |

शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि. २१ डिसेंबर, २०१९ चे

## परिशिष्ट -ब

## अधिसंख्य पदांवर तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक देण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचा-यांचा तपशिल

| अ. क्र. | विभागाचे नाव | नियुक्तीनंतर अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या अधिकारी व कर्मचा-यांची नावे | | अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी/ कर्मचा-यांची नावे | निर्माण केलेल्या अधिसंख्य पदांची संख्या (ही संख्या स्तंभ ५ पेक्षा जास्त नसावी | अधिसंख्य पदांवर दर्शविण्यात आलेल्या व ११ महिन्यांकरीता तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक देण्यात आलेल्या कर्मचा-यांची नावे (असे अधिकारी व कर्मचारी ज्या पदावर कार्यरत असतील ते पद अधिसंख्य पद म्हणून निर्माण करावे) | या शासन निर्णयापुर्वी सेवा समाप्त करण्यात आलेल्या व अधिसंख्य पदांवर ११ महिन्यांकरीता तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक देण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचा-यांची नावे. (असे अधिकारी व कर्मचारी सेवासमाप्तीपुर्वी ज्या पदावर कार्यरत होते ते पद अधिसंख्य पद म्हणून निर्माण करावे) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | गट | नावे | | | | |
| | | अ | | | | | |
| | | ब | | | | | |
| | | क | | | | | |
| | | ड | | | | | |
| | | एकूण | | | | | |

**शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि. २१ डिसेंबर, २०१९ चे**

**परिशिष्ट - क**

**(वाचा-शासन निर्णयातील परिच्छेद क्र.४.३ )**

.......................यांचे कार्यालय

क्रमांक------------

दिनांक-----

**कार्यालयीन आदेश**

ज्याअर्थी श्री./श्रीमती .................. यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोग /निवड मंडळ /निवड समिती शिफारसपात्र उमेदवार म्हणून ................ या कार्यालयात.............. या पदावर अजा/अज/विजा-भज/विमाप्र व इमाव या प्रवर्गांकरिता (जे लागू नसेल ते खोडावे) राखीव असलेल्या जागेवर कार्यालयीन आदेश क्र....,दि.... अनुसार दि........... पासून नियुक्ती दिली आहे;

ज्याअर्थी,

(१)श्री./श्रीमती-------- यांचे---- अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र जात पडताळणी समिती------ यांनी त्यांचे आदेश क्र.-------- , दि.------ अन्वये अवैध ठरविले आहे.

(२)ज्याअर्थी श्री./श्रीमती ---- यांनी त्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर ----- या मागासप्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे.

(३) ज्याअर्थी श्री./श्रीमती-------- यांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र अद्याप सादर केले नाही

(४) ज्याअर्थी श्री./श्रीमती-------- यांनी त्यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी विहित मुदतीत जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केला नाही.

(५) ज्याअर्थी श्री./श्रीमती ---- यांनी त्यांचा अनुसूचित जमातीचा दावा सोडून दिला आहे

(६) ज्याअर्थी श्री./श्रीमती ---- यांनी त्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्याच्या जात पडताळणी समितीच्या दि.---- च्या निर्णयाच्या विरोधात माननीय न्यायालयात याचिका दाखल केली आहे व ज्याअर्थी त्यांच्या प्रकरणी माननीय उच्च न्यायालयाने किंवा माननीय सर्वोच्च न्यायालयाने जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्याच्या समितीच्या निर्णयास कोणतीही स्थगिती दिली नाही.

(वरील (१) ते (६) पैकी जे लागू असेल ते ठेवावे);

ज्याअर्थी मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ (चेअरमन ॲन्ड मॅनेजिंग डायरेक्टर,एफसीआय आणि इतर विरूद्ध जगदिश बालाराम बहिरा व इतर) व इतर याचिका यामध्ये दि.६ जुलै,२०१७ रोजी जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना सेवेत संरक्षण देय ठरत नाही, असा निर्णय दिला आहे;

ज्याअर्थी शासन निर्णय शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि. २१ डिसेंबर,२०१९ अन्वये शासन निर्णय क्र. क्र.बीसीसी- १०९४/प्र.क्र.६८ /९४/१६-ब, दि.१५ जून,१९९५, शासन निर्णय क्र.बीसीसी- २००४/प्र.क्र.४५/ ०४/१६-ब,दि.२४ जून,२००४, शासन निर्णय क्र.बीसीसी- २००२/प्र.क्र.९३/ ०४/१६-ब,दि.३० जून,२००४, शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२०१२/प्र.क्र. ३३२/ १६-ब, दि.३०जुलै,२०१३, शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२०१५/ प्र.क्र. २७६A/१६-ब,दि.२१ ऑक्टोबर २०१५ अधिक्रमित ठरविण्यात आले आहेत;

ज्याअर्थी श्री./श्रीमती----------- यांच्या सेवा शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि. २१ डिसेंबर,२०१९ अनुसार या आदेशाच्या दिनांकापासूनअधिसंख्य पदावर वर्ग करण्यात येत आहे;

त्याअर्थी श्री./श्रीमती----------- हे/या तात्पुरत्या स्वरूपात ११ महिन्यांकरीता अथवा ते/त्या सेवेत राहिले असते तर ते/त्या ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अधिसंख्य पदावर कार्यरत राहतील.

श्री./श्रीमती-------- यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यापुर्वी त्यांना जेवढे मासिक वेतन व भत्ते मिळत होते,तेवढे वेतन व भत्ते त्यांना पुढील आदेश होईपर्यंत देण्यात येईल.

आदेशानुसार

( )

नियुक्ती/ प्राधिकृत अधिकारी

प्रत,

संबंधित अधिकारी /कर्मचारी

**शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि. २१ डिसेंबर, २०१९ चे**

**परिशिष्ट -ड**

**(वाचा-शासन निर्णयातील परिच्छेद क्र.४.३ )**

.......................यांचे कार्यालय

क्रमांक-----------

दिनांक-----

## कार्यालयीन आदेश

ज्याअर्थी श्री./श्रीमती .................. यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोग/निवड मंडळ/निवड समिती शिफारसपात्र उमेदवार म्हणून ............... या कार्यालयात.............. या पदावर अजा/अज/विजा-भज/विमाप्र व इमाव या प्रवर्गांकरिता (जे लागू नसेल ते खोडावे) राखीव असलेल्या जागेवर कार्यालयीन आदेश क्र....,दि.... अनुसार दि........... पासून नियुक्ती देण्यात आली होती;

ज्याअर्थी श्री./श्रीमती-------- यांचे---- अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र जात पडताळणी समिती------ यांनी त्यांचे आदेश क्र.--------- , दि.------ अन्वये अवैध ठरविले होते;

ज्याअर्थी श्री./श्रीमती-------- यांचे---- अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र जात पडताळणी समिती------ यांनी अवैध ठरविल्यामुळे त्यांच्या सेवा या कार्यालयाचे आदेश क्र.---, दि. ---अन्वये समाप्त करण्यात आल्या होत्या;

ज्याअर्थी शासन निर्णय शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि.२१ डिसेंबर,२०१९ अन्वये अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याच्या कारणास्तव यापुर्वी सेवा समाप्त करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचा-यांना ,वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तिय सुधारणा,दि.१०.९.२००१ अन्वये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार अधिसंख्य पदे निर्माण करून त्यांना तात्पुरत्या स्वरूपात ११ महिन्यांकरीता किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अधिसंख्य पदावर नेमणूक देण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत;

त्याअर्थी श्री./श्रीमती यांना----------- या आदेशाच्या दिनांकापासून ----- या पदाच्या अधिसंख्य पदावर तात्पुरत्या स्वरूपात ११ महिन्यांकरीता किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अधिसंख्य पदावर नेमणूक देण्यात येत आहे.

श्री./श्रीमती --------- यांना ते/त्या सेवेत राहिले असते तर त्यांना जेवढे वेतन मिळाले असते तेवढे दरमहा वेतन त्यांना पुढील आदेश होईपर्यंत देण्यात येईल

आदेशानुसार

( )

नियुक्ती/प्राधिकृत अधिकारी

प्रत,

संबंधित अधिकारी /कर्मचारी

**शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि. २१ डिसेंबर, २०१९ चे**

**परिशिष्ट -इ**

**(वाचा-शासन निर्णयातील परिच्छेद क्र.४.३ )**

क्र.

------------ विभाग,

दिनांक-

प्रति,

अमुस/प्रधान सचिव/सचिव,

वित्त विभाग,मंत्रालय,

मुंबई-४०० ०३२

विषय- अधिसंख्य पदे निर्माण करण्याबाबत

संदर्भ- **शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब,**

**दि. २१ डिसेंबर,२०१९**

महोदय,

संदर्भाधिन शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याच्या कारणास्तव सदर शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात येणा-या तसेच सदर शासन निर्णयापुर्वी सेवामुक्त करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचा-यांच्या संख्येइतकी, असे अधिकारी व कर्मचारी सध्या ज्या पदावर कार्यरत असतील अथवा सेवासमाप्तीपुर्वी ते ज्या पदावर कार्यरत होते त्या पदाचे अधिसंख्य पद निर्माण करून त्यांना मानवतावादी दृष्टिकोनातून तसेच प्रशासनाची होणारी अडचण दूर करण्यासाठी सर्व संबंधित प्रशासकिय विभागांनी वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तिय सुधारणा,दि.१०.९.२००१ अन्वये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार अधिसंख्य पदे निर्माण करून त्यांना तात्पुरत्या स्वरूपात ११ महिन्यांकरीता किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अधिसंख्य पदावर नेमणूक द्यावी,असे आदेश देण्यात आले आहेत.

२. या विभागाच्या खुद्द व अधिपत्याखालील कार्यालयातील खालील अधिकारी व कर्मचा-यांच्या सेवा त्यांनी अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याच्या कारणास्तव अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आल्या आहेत-

| अ.क्र | अधिकारी/ कर्मचा-याचे नाव | पदनाम व गट | नियुक्तीचा दिनांक | अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आल्याचा दिनांक | अधिसंख्य पदावर देण्यात येणारे मासिक वेतन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

३. तसेच या विभागाच्या खुद्द व अधिपत्याखालील कार्यालयातील खालील अधिकारी व कर्मचा-यांच्या सेवा त्यांनी अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याच्या कारणास्तव यापुर्वी समाप्त करण्यात आल्या आहेत-

| अ.क्र | अधिकारी/ कर्मचा-याचे नाव | पदनाम व गट | नियुक्तीचा दिनांक | सेवा समाप्त करण्यात आल्याचा दिनांक | अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आल्याचा दिनांक | अधिसंख्य पदावर देण्यात येणारे मासिक वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

४. संदर्भाधिन शासन निर्णयान्वये आदेशित करण्यात आल्याप्रमाणे या विभागाच्या खुद्द व अधिपत्याखालील कार्यालयातील उपरोक्त परिच्छेद २ व ३ मधील अधिकारी व कर्मचा-यांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.असंक-१००१/ प्र.क्र.२९/ २००१/वित्तिय सुधारणा,दि.१०.९.२००१ अन्वये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार आपल्या विभागास सादर करण्यात येत आहे.त्यास कृपया त्वरीत मान्यता द्यावी,ही विनंती.

आपला,

(            )

प्रत, माहितीसाठी अग्रेषित,

सचिव (साविस), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.